सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/परीक्षा शुल्क माफी/२०२६/2990
दिनांक : 0 3 NOV 2026

प्रति,
प्राचार्य/संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या
सर्व तांत्रिक पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

विषय : अवर्षण/दुष्काळग्रस्त भागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत...

संदर्भ : १. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२६/प्र.क्र.८२/मदत/२, दि.२५.०९.२०२६
२. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी/२०२६/८३१ दिनांक १४.१०.२०२६
३.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी/२०२६/८४९ दिनांक २१ ऑक्टोबर २०२६
४.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी/२०२६/८८४ दिनांक ०३.११.२०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय क्रमांक १ नुसार,सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger -१ (प्रथम कळ) लागू झालेल्या ३४ जिल्ह्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन सदर तालुक्यांतील रहिवाशी असलेल्या शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या सवलतीचा समावेश आहे. त्यानुसार मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे संदर्भ क्र.२ व ३ चे पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी असे कळविलेले आहे.

तरी, काही महाविद्यालये/स्वायत्त संस्थांकडून अवर्षणग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांकडे परीक्षा शुल्काची मागणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी संचालनालयास प्राप्त झालेल्या आहेत. या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, शासनाने जाहीर केलेल्या अवर्षणग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ देणे बंधनकारक आहे तसेच परीक्षा अर्ज भरताना परीक्षा शुल्काच्या अनुषंगाने कोणत्याही पात्र विद्यार्थ्यांस अडचण निर्माण होणार नाही, याची संस्थांनी खातरजमा करावी व याबाबत मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे संदर्भ क्र.४ चे पत्र सोबत जोडण्यात येत आहे. सदर पत्राचे अवलोकन करुन संस्थानी दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे.

सहपत्र : वरीलप्रमाणे

(डॉ.ए.बी.बोराडे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत : **मा.संचालक**,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७३५६, ४६५, ४९२, ४४२
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी / २०२६/८८४ दिनांक : ३.११.२०२६

प्रति

प्राचार्य/संचालक

संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या

सर्व तांत्रिक पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : राज्यातील अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांकडुन परीक्षा शुल्क न आकारण्याबाबत..

संदर्भ :

१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी १५९२/१२०२/ (११३२)/साशि-५, दि.१८.१०.१९९३
२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत/ २, दि.२५.०९.२०२६.
३. शासन पत्र उ व तं शि विभाग क्रमांक ६-१८७०५८४/२७१०१०/२६१/२०२६-MHT(HE-२), दि.३०,०९.२०२६
४. शासन पत्र उ व तं शि विभाग क्रमांक क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.८५५/ई-१८८९७९९/तांशि-४, दि : १४ ऑक्टोबर, २०२६
५. संचालनालयाचे पत्र क्रमांक २/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी / २०२६/८३१, दि.१४.१०.२०२६
६. अध्यक्ष, छात्रभारती महाराष्ट्र यांचे अवर्षणग्रस्त विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीच्या अंमलबजावणीबाबतचे दि. २९.१०.२०२६ रोजीचे निवेदन.

राज्यातील "अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी योजने" च्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार व शासनाने दिलेल्या निर्देशानुसार संचालनालयाने संदर्भाधीन क्रमांक ५ अन्वये सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार, शासनाने संदर्भाधीन दिनांक २५.९.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी असे कळविलेले आहे.

तथापि, शासनाच्या निर्देशांनंतरही काही महाविद्यालये/स्वायत्त संस्थांकडून अवर्षणग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांकडे परीक्षा शुल्काची मागणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी या संचालनालयास प्राप्त होत आहेत. विशेषतः, महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ अनुज्ञेय नसल्याचे सांगून त्यांच्याकडून परीक्षा शुल्काची आकारणी करण्यात येत असल्याचे तक्रारीमध्ये नमुद करण्यात आले आहे. तसेच, काही स्वायत्त संस्थांकडून संस्थेच्या स्वायत्ततेचा आधार घेऊन परीक्षा शुल्काची मागणी करण्यात येत असल्याचेही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, शासनाने जाहीर केलेल्या अवर्षणग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ देणे बंधनकारक आहे. त्यामुळे, संस्थेचे स्वायत्त स्वरूप अथवा विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचा लाभ मिळत असल्याचे कारण पुढे करून पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्काची आकारणी करण्यात येऊ नये. यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांनुसारच कार्यवाही करण्यात यावी व पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीच्या लाभापासून वंचित ठेवण्यात येऊ नये.

तरी, शासनाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासन निर्देशांचे काटेकोर पालन करण्यात यावे. अवर्षणग्रस्त तालुक्यांतील कोणत्याही पात्र विद्यार्थ्याकडून परीक्षा शुल्क आकारण्यात येणार नाही, तसेच परीक्षा अर्ज भरताना परीक्षा शुल्काच्या अनुषंगाने कोणत्याही पात्र विद्यार्थ्यास अडचण निर्माण होणार नाही, याची संस्थांनी खातरजमा करावी.

सदर बाब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताशी संबंधित असल्याने यास सर्वोच्च प्राधान्य देऊन शासनाच्या निर्देशांची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करावी.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: १. मा. खाजगी सचिव, मा. मंत्रीमहोदय, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सादर
२. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर
३) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे यांना कळविण्यात येते की, आपल्या स्तराबरुनदेखील संबंधित संस्थांना आवश्यक सूचना निर्गमित करून शासनाच्या निर्देशांची अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.
४) कुलसचिव, अकृषी/तंत्रज्ञान विद्यापीठे यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
५) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांना आवश्यक कार्यवाहीसाठी